

कोल्हापूर : मनपा स्तर शालेय कबड्डी स्पर्धेत १४, १७ व १९ वयोगटात अजिंक्यपद पटकावणारे वसंतराव देशमुख हायस्कूल, दत्ता बाळ हायस्कूल, वालावलकर हायस्कूल व विवेकानंद कॉलेजचे मुला-मुलींचे संघ. (छाया : पप्पू अत्तार)

# देशमुख, दत्ता बाळ, वालावलकर, विवेकानंद संघ विजेते

**मनपास्तर शालेय कबड्डी स्पर्धा**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

चुरशीच्या अंतिम सामन्यात वसंतराव देशमुख हायस्कूल, दत्ता बाळ हायस्कूल, वालावलकर हायस्कूल व विवेकानंद कॉलेज यांनी प्रतिस्पर्धी संघाचा पराभव करून मनपास्तर कबड्डी स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले.

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण समिती .व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आयोजित मनपा स्तर कबड्डी स्पर्धा छत्रपती संभाजी महाराज विभागीय क्रीडा संकुल येथील कबड्डी मैदानावर स्पर्धा सुरू आहेत. स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांक विजयी संघांना प्रा. सचिन पुजारी, विशाल जाधव व प्राध्यापक देवेंद्र डांगोळे यांच्याकडून ट्रॉफी देण्यात आली.

१४ वयोगट मुलांच्या अंतिम सामन्यात दत्ता बाळ हायस्कूल संघाने व ज देशमुख इंग्लिश स्कूलचा ३४-२९ असा पराभव केला. विजयी संघात आविष्कार दिंडे, साहिल अडसूळ, श्लोक संकपाळ, राजवीर साळुंखे, शौर्य कांबळे, शिवराज भस्मे, वेदांत बंगडे, विराट पाटील, रिषभ सय्यद, उत्तम कात्रट, पीयूष घुगरे यांचा समावेश होता.

१४ वयोगटातील मुलींच्या अंतिम सामन्यात व देशमुख हायस्कूलने शा. कृ. पंत वालावलकर हायस्कूलचा २८-५ असा एकतर्फी पराभव केला. विजयी संघात ऋतुजा तगारे, आराध्या काजवे, स्वरा कडव, श्रेया चव्हाण, कादंबरी चव्हाण, दिव्या गुरव, आदिती कमलाकर, वैभवी हुजरे, राहील लांबोरे, काव्या पाटील यांचा समावेश आहे.

१७ वयोगटातील मुलींच्या अंतिम लढतीत शा. कृ. पंत वालावलकर हायस्कूलने शहाजी कॉलेजचा १४-१२ असा पराभव केला. विजयी संघात अपेक्षा येडगे, सृष्टी पाटील, समीक्षा पाटील, सई खराडे, श्रुतिका वायंगणकर, श्रावणी बोडके, वैद्यही पाटील, रितिका जाधव, भक्ती कुंभार, धनश्री खोंदल, स्नेहा खापणे, देवाप्रिया एम. व्ही. यांचा समावेश आहे.

१९ वयोगटातील मुलींच्या अंतिम सामन्यात विवेकानंद कॉलेजने कमला कॉलेजवर २३-१९ अशी मात केली. विजयी संघात आसावरी धोत्रे, सायली पाटील, सायली मोरे, साक्षी हावलदार, समीक्षा पोवार, श्रुती भोसले, श्रावणी मराठे, शीतल कोकरे, गौरी गोसावी, ऐश्वर्या वटकर, ज्योती मिरका यांचा समावेश .

पुण्य नगरी
बुधवार, ८ ऑक्टोबर २०२५

# विवेकानंद'मध्ये राष्ट्रीय स्तर परीक्षांबाबत मार्गदर्शन

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयात सर्व शास्त्र विभागांच्या वतीने आयआयटी-जॅम (IIT-JAM) आणि गेट (GATE) या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये आयआयटी मुंबईचे तज्ज्ञ रामानंद सिंग यादव आणि भूपिंदर कौर यांनी मार्गदर्शन केले. प्रारंभी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. संजय लट्ठे यांनी केले. यावेळी वक्त्यांनी परीक्षेची रचना, गुणांकन पद्धती, विषयानुसार तयारीचे नियोजन, तसेच वेळेचे व्यवस्थापन या बाबींविषयी सविस्तर माहिती दिली. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा यशस्वीपणे पार पडली. आभार प्रा. डॉ. अर्जुन कुंभार यांनी मानले.

8.10.25